# पंतप्रधान स्वानिधी लोन योजना

एखंडे योगेश सुदाम रायकर शशांक सुरेश
आचार्य पदवी विद्यार्थी
विस्तार शिक्षण विभाग
डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली




पंतप्रधान स्वानिधी योजनेची सुरुवात दिनांक १ जून २०२० रोजी सुरू केली. या योजनेअंतर्गत सर्व गरजू उद्योजकांना कर्ज उपलब्ध देण्यात येते. या योजनेचा लाभ पथ विक्रेते, भाज्या विक्रेते, फळे विक्रेते, रस्त्याच्या कडेचे दुकानदार विक्रेते यांना होणार आहे. प्रधानमंत्री स्वनिधी योजनेचा लाभ अनुदानाच्या स्वरूपात कर्ज उपलब्ध करून देणे आणि सुलभ हप्त्यांमध्ये त्याची परतफेड करून घेणे. स्वानिधी योजनेंतर्गत आतापर्यंत २७.३३ लाख अर्ज प्राप्त झाले आहेत. या योजनेंतर्गत १४.३४ अर्ज मंजूर झाले आहेत. स्वानिधी योजनेंतर्गत आतापर्यंत ७.८८ लाख कर्ज वितरित केले गेले आहे.

## पंतप्रधान स्वानिधी योजनेची उद्दीष्टे

- आपल्या सर्वांना माहितच आहे की कोरोनाव्हायरस साथीच्या आजारामुळे देशाची संपूर्ण अर्थव्यवस्था विस्कळीत झाली आहे, लोक घराबाहेर पडू शकले नाहीत आणि छोट्या छोट्या व्यवसायाची स्थिती त्रस्त आहे. अशा परिस्थितीत रस्त्यावर आपला व्यवसाय करायचा, फळं आणि भाज्या विकल्या किंवा डेहरी जामचे काम करायचा अशा छोट्या उद्योजकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.
- ही समस्या लक्षात घेता केंद्र सरकारने स्ट्रीट व्हेंडर सेल्फ-रिलायंट फंड योजना सुरू केली, ज्या अंतर्गत या लोकांना पुन्हा काम सुरु करण्यास मदत मिळणार आहे. काम पुन्हा सुरु करण्यासाठी त्यांना केंद्र सरकारकडून रुपये १०,००० कर्ज दिले जाईल. या लोकांना स्वावलंबी आणि सशक्त बनविणे म्हणजे पीएम स्वनिधी योजनेचे मुख्य उद्दिष्ट्य आहे. जेणेकरुन त्यांना पुन्हा व्यवसाय सुरू करण्यासाठी कोणतीही अडचणींचा सामना करावा लागू नये किंवा कर्जदाराच्या दारात उभे राहू नये. या सर्व बाबींचा विचार करून केंद्र सरकाने पीएम स्वनिधी योजना अमलात आणली आहे.

## प्रधानमंत्री स्वानिधी योजनेचे फायदे

- पीएम स्वनिधी योजनेंतर्गत देशातील ५० लाखाहून अधिक लोकांना या योजनेअंतर्गत कर्जाचा लाभ घेता येणार आहे.
- केंद्र सरकार पथदिव्यांकरिता पथक विक्रेत्यांसाठी विशेष पीएम स्वानिधी योजनेचा लाभ देते.
- रस्त्याच्या कडेला सामान विक्री करणारे शहरी ग्रामीण भागात राहणारे लोक स्ट्रीट वेंडर सेल्फ-रिलायंट फंड योजनेंतर्गत लाभार्थी मानले जातील.
- पंतप्रधान स्वानिधी योजनेंतर्गत देशातील पथ विक्रेते १०,००० रुपयांपर्यंत भांडवली कर्जे घेऊ शकतात. जे लाभार्थी वर्षभर सुलभ हप्त्यांमध्ये परतफेड करू शकतात.
- स्वनिधी योजनेंतर्गत जर एखाद्या व्यक्तीने कर्ज घेतल्यास आणि कर्जाची रक्कम वेळेपूर्वी परत केली, तर केंद्र सरकार सात टक्के वार्षिक व्याज त्यांच्या बँक खात्यात अनुदान म्हणून जमा करेल.
- कोरोना संकटाच्या काळात पडलेला व्यवसाय सुधारण्यासाठी ही योजना बरीच पुढे जाईल आणि व्यवसाय नव्याने सुरू होईल आणि स्वावलंबी भारत मोहिमेलाही वेग येईल.
- तंत्रज्ञानाचा वापर करून क्षमता वाढविण्याबरोबरच कोरोना संकटातील पंतप्रधान स्वानिधी योजना व्यवसाय पुन्हा सुरू करण्यासाठी आणि व्यवसाय नूतनीकरणासाठी हि योजना मोलाची ठरणार आहे.

### पंतप्रधान स्वानिधी योजना लाभ

- प्रधानमंत्री स्वानिधी योजनेंतर्गत छोट्या व्यापाऱ्यांना सरकारकडून १०,००० रुपयांपर्यंतचे कर्ज दिले जाईल.
- हे कर्ज घेण्यासाठी लाभार्थी व्यापाऱ्याला कोणत्याही प्रकारची हमी देण्याची गरज नाही.
- हे कर्ज व्यापारी एका वर्षाच्या आत सरकारला सहज हप्त्यांमध्ये परतफेड करू शकतात.
- याशिवाय कर्जावर वर्षभर व्याज देखील कमी आकारले जाईल.
- सरकारने अद्याप व्याज दराला माहिती दिली नाही, पण हा व्याज दर खूप कमी असणार आहे.
- शिवाय, पीएम स्वनिधी योजना कर्जाच्या अंतर्गत कर्जाची रक्कम वेळेपूर्वी परत करणाऱ्या व्यापाऱ्याला ७% वार्षिक व्याज अनुदान म्हणून त्यांच्या बँक खात्यात हस्तांतरित केले जाईल. या योजनेचा सर्वात चांगला भाग म्हणजे दंड करण्याची तरतूद केलेली नाही.

### पीएम स्वनिधी योजना अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे व पात्रता कोणती ?

अर्जदार हा भारताचा रहिवासी असावा, अर्जदाराचे आधार कार्ड, मतदार ओळखपत्र, मोबाइल नंबर, पासपोर्ट आकाराचा फोटो, बँक खाते पासबुक, या योजनेंतर्गत देशातील फक्त छोट्या पथ विक्रेत्यांना पात्र मानले जाईल.

### पीएम स्वनिधी योजनेचा अर्ज कसा करावा ?

सरकारकडून पंतप्रधान स्वानिधी योजनेंतर्गत लाभ घेऊ इच्छित असलेल्या देशातील कोणत्याही इच्छुक व्यापारी लाभार्थ्यांना या योजनेसाठी अर्ज करावा लागेल. कोरोना व्हायरसच्या संकटाच्या पार्श्वभूमीवर रस्त्यावर विक्रेत्यांना आर्थिक मदत देण्यासाठी स्वानिधी योजना सुरू केली गेली.

हि आर्थिक मदत मिळविण्यासाठी पथ विक्रेत्यांना अधिकृत संकेतस्थळावर जाऊन https://pmsvanidhi.mohua.gov.in/ ऑनलाईन अर्ज करावा लागेल. या योजनेंतर्गत अर्ज करण्यासाठी बँकेतून अर्जही मिळू शकतो.

### पीएम स्वनिधी योजना २०२१ कर्ज कोण देईल ?

- अनुसूचित वाणिज्य बँक
- प्रादेशिक ग्रामीण बँक
- स्मॉल फायनान्स बँक
- सहकारी बँक
- नॉन बँकिंग फायनान्स कंपन्या
- मायक्रो फायनान्स संस्था आणि बचत गट

(संपर्क: +९१ ९३७०९३८७९५)

★ ★ ★

(पान क्रमांक १६ वरून...)

**खत व्यवस्थापन:** अंजीराच्या झाडांनी नीट व जोमाने वाढ होण्यासाठी लागवडीच्या सुरुवातीच्या काळात नियमित खते द्यावीत. एक वर्षाच्या झाडाला साधारणपणे १ घमेले शेणखत व १०० ते १५० ग्रॅम अमोनियम सल्फेट पुरेसे होते. दरवर्षी हे प्रमाण वाढवीत नेऊन ५ वर्षे वयाच्या झाडांना ४ ते ५ घमेली शेण खत व १ किलो अमोनियम सल्फेट द्यावे. लहान झाडांना खते नेहमी पावसाळयाच्या सुरुवातीला घालावीत नंतर मात्र मोठया झाडांना खते विश्रांततीचा काळ संपताना म्हणजे सप्टेंबर महीन्याच्या अखेरीस द्यावीत. ५ ते ६ वर्षे वयाच्या झाडास ६०० ग्रॅम नत्र, २५० ग्रॅम स्फूरद व २५० ग्रॅम पालाश दिल्याने फळे चांगल्या प्रतीची मिळतात.

**पाणी व्यवस्थापन:** अंजीराच्या झाडाला फार पाणी लागत नाही. परत फळझाड वाढीच्या काळात हंगाम, जमिनीचा मगदूर व मशागतीचा प्रकार यानुसार जरुरीप्रमाणे नियमित पाणी द्यावे झाड फळावर आल्यावर ऑक्टोबर ते मे महिन्यात नियमित पाणी द्यावे. जूलै व ऑगस्ट हा काळ झाडाच्या विश्रांतीचा असतो. फळे लागून वाढत असताना पाण्यात हयगय होऊ देऊ नये. कारण त्यामुळे फळांच्या आकारावर अनिष्ठ परिणाम होतो. फळे पिकू लागल्यावर मात्र पाणी अतिशय कमी म्हणून आळी नुसती ओली होतील एवढे द्यावे. कारण अधिक पाण्याने फळाची गोडी कमी होते. फळे तोडणे पूर्ण झाल्यावर झाडाचे पाणी बंद करावे.

**आंतरपिके:** आंतरपिके घेताना मूळ बागेची हेळसांड होता कामा नये व फळझाडांना आंतरपिकापासून उपद्रव ही होवू नये यासाठी आंतरपिकाची निवड फार महत्वाची ठरते. ही आंतरपिके कमी कालावधीची असावीतच शिवाय त्यांची मुळे खूप खोल जाणारी नसावीत. ताग, धैंचा इ. सारखी हिरवळीची पिके फरसबी, मटकी इ. व्दिदल पिके घेतल्याने जमिनीची प्रत सुधारण्यास मदत होते. ज्यावेळी आंतरपिक घेतले नाही त्यावेळी बाग स्वच्छ ठेवणे हे तितकेच जरुरीचे आहे.

**बहार धरणे:** अंजीराला दोन वेळा फळ बहार येतो. पावसाळयात येणाऱ्या बहाराला खटटा आणि उन्हाळयात येणाऱ्या बहाराला मीठा बहार म्हणतात. खटटा बहारातील फळे जूलै किवा ऑगस्टमध्ये तयार होतात, परंतु ती अत्यंत बेचव असतात. मीठा बहारातील फळे मार्च, एप्रिलमध्ये तयार होतात. फळांचा दर्जा व उत्पन्न चांगल्या प्रतीचे मिळते व बाजारभाव सुध्दा चांगला मिळतो.

**उत्पादन:** दुसऱ्या वर्षापासून अंजिरास थोडी थोडी फळे येऊ लागतात. परंतु फळाचे उत्पादन झाडे उत्तम पोसेपर्यंत घेऊ नयेत. चवथ्या वर्षापासून उत्पादन घेण्यास हरकत नाही. सात आठ वर्षाची झाडे झाल्यावर उत्पादन चांगले येते. उत्तम काळजी, मशागत, खते दिली तर एका झाडापासून २५ ते ४० किलो फळे मिळतात.